International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# सहकारी क्षेत्राची रोजगारनिर्मिती मधील भूमिका

**प्रा. डॉ. बनसोडे सत्यवान पुंडलिक**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर, ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर
*Corresponding Author- प्रा. डॉ. बनसोडे सत्यवान पुंडलिक*

**प्रस्तावना**

आज जगभरात सहकारी क्षेत्राकडे रोजगार निर्मिती करणारे एक प्रमुख क्षेत्र म्हणून पाहिले जाते. भारतात स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी क्षेत्राचा विकास वेगवेगळया टप्प्यांमधून झाला. सहकारी चळवळ निरनिराळ्या क्षेत्रात वाढली आहे. कृषी, प्रक्रिया, विपणन, बँकिंग, ग्राहक भांडार, सेवा क्षेत्र यासारख्या विविध क्षेत्रात सहकारी संस्था कार्यरत आहेत.त्यातून सहकारी क्षेत्राने मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती केली आहे. देशातील तरुणांना रोजगाराच्या व्यापक संधी सहकारी क्षेत्रातून उपलब्ध झाल्या आहेत. विविध शाखांमधील पदवीधारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. याशिवाय सहकारी क्षेत्रात सुयोग्य रोजगार करता यावे म्हणून त्यांना प्रशिक्षणही दिले जाते. जागतिकीकरणानंतर वेगाने झालेल्या बदलातही सहकारी क्षेत्र टिकून राहिलेले आहे. तसेच ते आता जास्त स्पर्धात्मक व स्वयंपूर्ण बनत चालले आहे. त्यामुळे सहकारी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होत आहे.

**संशोधन पद्धती :**

या शोधनिबंधासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करताना घटक विश्लेषण (Data Analysis) या पद्धतीचा वापर केला. त्यासाठी तथ्य संकलन व माहिती संकलनासाठी प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेतला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

१. सहकार ही संकल्पना समजावून घेणे.
२. विविध प्रकारच्या सहकारी संस्थेचा अभ्यास करणे.
३. सहकारी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी अभ्यासणे.

**शोधनिबंधाची गृहिते :**

१. गेल्या काही वर्षात सहकारी क्षेत्राची वेगाने वाढ होत आहे.
२. सहकारी क्षेत्रात विविध सहकारी संस्थेचा समावेश होतो.
३. ग्रामीण व शहरी भागात विविध प्रकारच्या सहकारी संस्था काम करतात.
४. सहकार व रोजगारनिर्मिती यांचा जवळचा संबंध आहे.

**सहकाराचा परिचय :**

"सहकार " या शब्दाचा शब्दशः अर्थ परस्पर सहकार्य करणे, परस्परांच्या कामात मदत करणे किंवा सर्वाच्या हितासाठी एकत्रीतपणे काम करणे असा होतो.

**सहकाराची व्याख्या :** सहकार म्हणजे काय हे समजावून घेण्याच्या दृष्टीने सहकाराच्या व्याख्येचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. 'सहकार' या शब्दाची निश्चित व्याख्या सध्यातरी उपलब्ध नाही. सहकाराच्या अनेक व्याख्या आढळतात. परंतु या अनेक व्याख्यांपैकी कोणतीही व्याख्या सहकाराची संपूर्ण लक्षणे स्पष्ट करू शकत नाही. असे असूनसुद्धा सहकाराची अधिक समर्पक व चांगली व्याख्या म्हणून पुढील सांगता येईल.

**एच.कॅलव्हटची व्याख्या :** "व्यक्तीने स्वेच्छेने एकत्र येऊन आपल्या आर्थिक हितसंबंधाच्या उन्नतीसाठी समानतेच्या तत्वावर निर्माण केलेली संघटना म्हणजे सहकार होय."

**सहकारी संस्थांचे विविध प्रकार :**

१. सहकारी प्रक्रिया संस्था
२. सहकारी बँकिंग क्षेत्र

३. सहकारी विपणन संस्था
४. सहकारी ग्राहक भांडार
५. सहकारी गृहनिर्माण संस्था
६. औद्योगिक सहकारी संस्था
७. सेवा सहकारी संस्था
८. श्रमिक सहकारी संस्था
९. सहकारी शेती संस्था

इत्यादी विविध सहकारी संस्थांमध्ये कोणकोणत्या प्रकारच्या रोजगार संधी उपलब्ध होतात याची सविस्तर मांडणी पुढील प्रमाणे करता येते.

**सहकारी क्षेत्राची रोजगारनिर्मिती मधील भूमिका :**

**सहकारी प्रक्रिया संस्था :** ग्रामीण स्तरावर कार्यरत व स्थानिक गरजांची पूर्तता करणाऱ्या प्रक्रिया उद्योग क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांना विशेष कौशल्य अथवा गुणवत्ताधारक मनुष्यबळाची गरज नसते त्यामुळे स्थानिक स्तरावरील व्यक्तींना अशा संस्थेत सहज काम मिळू शकते म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी प्रक्रिया संस्थांना विशेष महत्व आहे. या सहकारी प्रक्रिया संस्थेमध्ये उसापासून साखर किंवा गूळ बनविणे, कापसापासून सूत व कापड तयार करणे, भातापासून तांदूळ अगर पोहे बनविणे, तेलबियांपासून खाद्यतेलाचे उत्पादन घेणे, दुधापासून विविध दुग्धजन्य पदार्थ बनविणे यासारख्या क्रिया या प्रक्रिया सहकारी संस्थांमध्ये चालतात. सहकारी प्रक्रिया संस्थांमध्ये सहकारी साखर कारखाने, सहकारी दुग्ध संस्था, कापूस सहकारी संस्था, फळे व भाजीपाला सहकारी संस्था, सहकारी कापड गिरण्या, सहकारी सुत गिरण्या आणि सहकारी डाळ गिरण्या इत्यादींचा समावेश होतो. या सर्व सहकारी प्रक्रिया संस्थांमध्ये लॅब असिस्टंट, सेल्स एक्झिक्युटिव्ह, मानव संसाधन व्यवस्थापक, साठा व्यवस्थापक, पर्यवेक्षक व तंत्रज्ञ इत्यादी पदांवर काम करण्याची संधी उपलब्ध होते. संबंधित पदांना अनुरूप अशी पात्रता निर्धारित केली जाते. वरील सहकारी प्रक्रिया संस्थेपैकी सहकारी साखर कारखान्याने आपल्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्यात यशस्वी झाले आहेत. ग्रामीण भागातील जवळपास ०५ लाख कुशल व अकुशल श्रमिक या उद्योगात कार्यरत आहेत. तसेच सहकारी साखर उद्योगांमुळे अनेक पुरक उद्योगधंदे सुरू झाले आहेत. उदा. दारू तयार करणे, कागद तयार करणे इत्यादी अनेक पुरक उद्योगधंद्यामुळे सहकारी साखर कारखाने रोजगारनिर्मिती क्षेत्रात बेरोजगारांसाठी एक आशास्थान निर्माण झालेले आहे. थोडक्यात सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती झाल्याचे दिसून येते.

**सहकारी बँकिंग क्षेत्र :**

भारतात सहकारी चळवळीची खरी सुरुवात सहकारी पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेद्वारे झाली. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारतात सहकारी बँकिंग क्षेत्र मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आहे. अनेक छोट्या- छोट्या गावांमध्येसुध्दा सहकारी बँका पोहोचलेल्या आहेत. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका, प्राथमिक व मध्यवर्ती भूविकास बँका, नागरी सहकारी बँका इत्यादी क्षेत्रांमध्ये तरुणांना व्यापक रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत. या सर्व सहकारी बँकांमध्ये क्लार्क, कॅशिअर, अधिकारी, कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापक, सरव्यवस्थापक, इत्यादी पदांवर काम करण्याच्या संधी उपलब्ध होतात. सामान्यपणे संबंधित पदांना अनुरूप अशी पात्रता निर्धारित केली जाते. अधिकारी पातळीवर पदवीधर, माहिती तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि सहकारी चळवळीविषय आत्मीयता या बाबी प्रामुख्याने लक्षात घेतल्या जातात. सहकारी बँकांनी ग्रामीण व शहरी अशा दोन्ही क्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध केल्या आहेत. थोडक्यात सहकारी क्षेत्रात कार्यरत बँका या प्रत्यक्ष रोजगारनिर्मिती करतातच; परंतु त्याचवेळी त्यांच्याद्वारे सदस्य तसेच समाजातील दुर्बल घटकांना करण्यात येणाऱ्या कर्जपुरवठ्यामुळे ही मोठ्या प्रमाणात अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होत असते.

**सहकारी विपणन संस्था :**

भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत आणि कृषीउत्पादन वाढीच्या प्रक्रियेत सहकारी विपणन संस्थेचे फार महत्व आहे. सहकारी विपणन ही एक व्यापक अर्थाची संकल्पना आहे. उत्पादक ते

उपभोक्त्यापर्यंत आवश्यक असणाऱ्या शेतमालाची विपणन क्रिया सहकारी तत्वावर करणारी संस्था म्हणजे सहकारी खरेदी-विक्री संस्था होय. सहकारी विपणन संस्था सहकाराच्या तत्वावर आपल्या सभासदांकडून मालाची खरेदी करून तो ग्राहकांना व व्यापाऱ्यांना विकण्याचे कार्य करतात. भारतात सहकारी विपणन संस्थांची रचना संघीय पद्धतीने झालेली आहे. प्राथमिक संस्था तालुका किंवा गावपातळीवर कार्य करतात. जिल्हा सहकारी विपणन संस्था जिल्हापातळीवर संघ म्हणून कार्य पाहते. राज्य सहकारी विपणन संघ ही राज्यपातळीवर काम पाहते. याशिवाय नाफेड ही संस्था राष्ट्रीयपातळीवर कार्य करते. या संस्थांमध्ये विविध टप्प्यांवर मनुष्यबळाची गरज भासते. शेतमालाचे एकत्रीकरण करणे, मालाची प्रतवारी करणे, मालाचा संग्रह करणे, शेतमालाची बांधणी आणि वाहतूक करणे, शेतमालावर प्रक्रिया करणे, शेतमालाची विक्री व्यवस्था सांभाळणे या विविध कार्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध होतात. अकुशल श्रमिकांबरोबरच कुशल व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची सुध्दा गरज भासते. व्यवस्थापक, सहाय्यक व्यवस्थापक, सल्लागार, वरिष्ठ सल्लागार, खरेदी व्यवस्थापक, विक्री व्यवस्थापक, लेखाधिकारी यासारख्या पदांवर रोजगाराची संधी उपलब्ध होते.

**सहकारी ग्राहक भांडार :**

जगात सहकारी चळवळीची खरी सुरुवात ग्राहक संस्थेपासून झाली आहे. ग्राहकांना त्यांच्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सहकारी तत्वावर स्वेच्छेने स्थापन केलेली संस्था म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय. भारतात ग्राहक सहकारी संस्था विविध स्तरांवर काम करतात. प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था, घाऊक सहकारी ग्राहक संस्था, राज्य ग्राहक सहकारी संघ, राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ अशा विविध पातळीवर ग्राहक सहकारी संस्था कार्य करतात. सभासदांकडील मालाचे एकत्रीकरण करणे, त्याची विक्री करणे, दर्जा नियन्त्रण राखणे, हिशेब राखणे, विविध स्तरांवरील व्यवस्थापन सांभाळणे इत्यादी कार्यांसाठी सक्षम कर्मचाऱ्यांची गरज असते. यामुळे या प्रकारच्या सहकारी संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात क्षेत्रात रोजगारनिर्मिती होते.

**इतर सहकारी संस्था :**

वर उल्लेख केलेल्या सहकारी संस्था व्यतिरिक्त सेवा सहकारी संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, औद्योगिक सहकारी संस्था यांसारख्या विविध सहकारी संस्थांमध्ये रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणात होते. पर्यवेक्षक, वित्तीय व्यवस्थापन, कर्मचारी व्यवस्थापन, खरेदी-विक्री व्यवस्थापन, संशोधन आणि विकास यांसारख्या विविध विभागांसाठी कर्मचाऱ्यांची गरज असते. इत्यादी प्रकारच्या कामांमध्ये बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होते.

**निष्कर्ष :**

सहकारी क्षेत्र हे आजही मोठ्या प्रमाणात मानवी श्रमावर आधारित कार्य करते यामुळे अशा क्षेत्राला असणारी मानवी संसाधनांची गरज मोठी असते. भारतासारख्या कृषी क्षेत्रावर जास्तभर असणाऱ्या अर्थव्यवस्थेत सहकारी तत्वावरील कार्यरत सहकारी विपणन संस्था, सहकारी प्रक्रिया संस्था, सहकारी बँका, सहकारी ग्राहक भांडार, सहकारी गृहनिर्माण संस्था, औद्योगिक सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, श्रमिक सहकारी संस्था आणि सहकारी शेती संस्था इत्यादी प्रकारच्या सहकारी संस्थेमुळे मोठ्या प्रमाणात हंगामी तसेच कायम स्वरूपाची रोजगारनिर्मिती होते. तसेच सरकारी स्तरावरील विविध अनुदाने व सहकारी क्षेत्राच्या उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमामुळे सुध्दा सहकारी क्षेत्रातील रोजगारनिर्मितीला मोठ्याप्रमाणात चालना मिळते.

**संदर्भ सूची** :

1. Chaudhary C. M., (2009), ‘Economics of Co-operation’, Sublime Publication, Jaipur.
2. Hajela T. N., (2000), ‘Cooperation’, Konark Publishers, Delhi.
3. बिरादार जाधव, (२००४), ‘सहकार’, तीर्थरूप प्रकाशन, नांदेड.

4. प्रा. डॉ. सी. जे. जोशी, प्रा. के. सी. जोशी, (२०२१), 'सहकाराचा विकास', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
5. प्रा. डॉ. रूपा शहा, प्रा. डॉ. बी. एच. दामजी, (२०२१), 'सहकाराचा विकास', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
6. www. nddb
7. www. vamnicom.gov.in
8. www. gdca.maharashtra.gov.in